This Question Paper consists of 37 questions 8 printed pages.
ह्या प्रश्नपत्रिकेत एकूण 37 प्रश्न आणि 8 छापील पाने आहेत.

**Code No.** कोड नं. **63/S/A/M**

Roll No. अनुक्रमांक | | | | | | | | | | | | |

**Set /** सेट **A**

# मराठी
# (204)

Day and Date of Examination (परीक्षेचा दिवस आणि तारीख) ..........................................

Signature of Invigilators (निरीक्षकाची सही) 1. ..........................................

2. ..........................................

---

**सामान्य अनुदेश :**

1. परीक्षार्थीने प्रश्नपत्रिकेच्या प्रथम पृष्ठावर आपला अनुक्रमांक लिहावा.
2. कृपाकरून प्रश्न-पत्र तपासून घ्या की पुस्तकाचे एकंदर पृष्ठ आणि प्रश्नांची संख्या प्रथम पृष्ठावर सर्वात वर छापलेली आहे, तेवढीच आहे किंवा नाही. तसेच प्रश्नांची संख्यापण क्रमिक रुपात असावी.
3. बहुपर्यायी प्रश्नांचे उत्तर देतांना तुम्हाला दिलेल्या पर्यायांतून योग्य तो पर्याय निवडावयाचा आहे. वेगळी देण्यांत येणाऱ्या उत्तर-पुस्तिकांमधे योग्य उत्तर लिहायचे आहे.
4. बहुपर्यायी प्रश्नांचे सोबतच सर्व प्रश्नांची उत्तरे निर्धारित वेळेतच द्यावयाची आहेत. बहुपर्यायी प्रश्नांसाठी जास्त वेळ देण्यांत येणार नाही.
5. उत्तर-पत्रिकेत ओळख निदर्शनास आणणे आणि योग्य जागेच्या व्यतिरिक्त अनुक्रमांक लिहिल्यास परीक्षार्थीला अयोग्य ठरविण्यांत येईल.
6. आपल्या उत्तर-पत्रिकांवर प्रश्न-पत्रिकेचा कोड संख्या 63/S/A/M सेट [A] लिहावेत.

# मराठी

# (204)

वेळ : 3 तास ] [ एकूण गुण : 100

**निर्देश :** (i) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(ii) **सर्व** प्रश्न काळजीपूर्वक वाचून मगच उत्तरे लिहा.

(iii) प्रश्न **1** ते **11** पर्यंत प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत. त्यातील योग्य पर्याय निवडून लिहा.

**1.** ज्या शब्दांचा वाक्यात उपयोग करताना त्यांच्या लिंग, वचन आणि क्रियापद यात कोणतातरी बदल होतो, तेव्हा त्याला _____ शब्द असे म्हणतात. 1

(A) विकारी (B) अविकारी

(C) नाम (D) सर्वनाम

**2.** मास्तरांनी मुलांना पुढे बसायला सांगून कोणाची गोष्ट सांगितली? 1

(A) अल्लाउद्दीन (B) टिळक

(C) कासव-ससा (D) सिंदबाद

**3.** हे _____ करी बांधियले। जनसेवे जीवन दिधले। ओळ पूर्ण करा. 1

(A) तिमिर (B) कंकण

(C) हात (D) प्राण

**4.** नागू गवळी कसा दिसत असे? 1

(A) झोपून उठल्यासारखा (B) चित्रातल्या मारुतीसारखा

(C) कुस्ती मारून आल्यासारखा (D) घाबरल्यासारखा

**5.** 'एका तळ्यात होती',

ही कविता कोणी लिहिली? 1

(A) शांता शेळके

(B) कुसुमाग्रज

(C) बालकवी

(D) ग. दि. माडगूळकर

**6.** पाचोंदा म्हणजे—

(A) पाच जणींचा समूह

(B) पूजा

(C) रास

(D) धान्य 1

**7.** खालीलपैकी निर्दोष शब्द ओळखा. 1

(A) अध्यात्मिक

(B) आध्यात्मीक

(C) आध्यात्मिक

(D) अध्यात्मीक

**8.** 'महर्षींचे स्वर्गारोहण' हा पाठ कोणत्या लेखसंग्रहातून घेतला आहे? 1

(A) माणदेशी माणसे

(B) समाधीवरील अश्रू

(C) श्यामची आई

(D) गोपुरांच्या प्रदेशात

**9.** लक्ष्मीने ती सुई _____ चिमटीत पकडली. 1

(A) पापणीच्या

(B) बोटांच्या

(C) डोळयांच्या

(D) दातांच्या

**10.** अंगी असोनि जाणपण। सदा सर्वदा तो लीन॥

हा चरण _____ चे उदाहरण आहे. 1

(A) रूपक अलंकार

(B) मोण अभंग

(C) अनन्वय अलंकार

(D) लहान अभंग

**11.** कवी कुसुमाग्रज यांनी कोणाला प्रश्न विचारला? 1

(A) परमेश्वराला (B) आकाशाला

(C) नक्षत्रांना (D) मुक्त प्रवाशाला

**12.** आचार्य विनोबा भावे यांचे पूर्ण नाव लिहा. 1

**13.** कन्याकुमारीपर्यंतच्या डोंगरांचे वैशिष्ट्य कोणते होते? 1

**14.** 'हाताच्या कांबी' म्हणजे काय? 1

**15.** रामदास स्वामींनी संभाजीराजांना पत्र कधी लिहिले? 1

**16.** सीताबर्डीच्या किल्ल्यावर इंग्लंडचा कोणता राष्ट्रध्वज फडकत होता? 1

**17.** लक्ष्मीबाई टिळक यांच्या आत्मचरित्राचे नाव लिहा. 1

**18.** वि. स. खांडेकर यांची दृष्टी पत्रावरील कोणत्या भागावर खिळून राहिली? 1

**19.** वीरपत्नी पतीच्या भाळी कोणता तिलक लावणार आहे? 1

**20.** 'मॅथेमॅटिक्स क्लब' ला सातत्याने मार्गदर्शन कोण करीत असे? 1

**21.** योग्य म्हण वापरून वाक्य पूर्ण करा.

आपण केलेली चूक सगळयांच्या नजरेत आल्यानंतर सुरेशने ...... 1

*(i)* पाय आपटले

*(ii)* आकाशपाताळ एक केले

*(iii)* रागाने बोल लावले

*(iv)* पायपीट केली

**22.** पुढील शब्द समूहाबद्दल **एक** शब्द लिहा. 1

*(i)* जुन्या, पारंपरिक विचारांचा माणूस

*(ii)* सर्व काही जाणणारा

**23.** (अ) खालील शब्दांचे प्रत्येकी दोन-दोन समानार्थी शब्द लिहा. 2

*(i)* छंद

*(ii)* तारुण्य

(ब) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. 2

*(i)* देशभक्त

*(ii)* प्रवृत्ती

**24.** खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :

प्रसन्नता ही मनाची स्पृहणीय स्थिती आहे. मन काम, क्रोध, खेद, लोभ इत्यादी भावनांनी जेव्हा व्यग्र असते, तेव्हा बुद्धी बाजूला पडते निर्णय चुकतात. आयुष्यात कोणत्याही क्षेत्रात यश मिळवायचे असेल, तर आपल्या बुद्धीला योग्य निर्णय घेता आले पाहिजेत. यासाठी मन प्रसन्न हवे. मन प्रसन्न असेल तरच नवनिर्मितीची क्षमता निर्माण होते. शरीराच्या अनेक व्याधींचा उगम मनाच्या आस्वास्थ्यात असतो आणि प्रकृतिस्वास्थ्य कमवण्याकरिता मन प्रसन्न असावे लागते. प्रसन्नता ही मनाच्या जाणिवेची एक सकारात्मक स्थिती आहे. अशी स्थिती नैसर्गिकरित्या होऊ शकते. ती प्रयत्नाने आणता येते. ती असणे आपल्या अस्तित्वाला आवश्यक असते कारण प्रसन्नता हीच आपल्या अस्तित्वाची प्रेरणा असते.

**प्रश्न :–**

*(i)* निर्णय केव्हा चुकतात? 1

*(ii)* मन प्रसन्न का हवे? 1

*(iii)* प्रसन्नतेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे, असे लेखकाने का म्हटले आहे? 2

**25.** खालील पद्यांश वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा.

जे कां रंजले-गांजले। त्यांसि म्हणे जो आपुले ।। १ ।।
तोचि साधू ओळखावा। देव तेथेचि जाणावा ।। २ ।।
मृदु सबाह्य नवनीत। जैसे सज्जनांचे चित्त ।। ३ ।।
ज्यांसि आपंगिता नाही। त्यांसि धरी जो हृदयी ।। ४ ।।
दया करणे जे पुत्रांसी। तेचि दासा आणि दासी ।। ५ ।।
तुका म्हणे सांगू किती। त्याचि भगवंताच्या मूर्ती ।। ६ ।।

**प्रश्न :–**

*(i)* सज्जनांचे चित्त कसे असते? 1

*(ii)* खरा साधू कसा ओळखावा? 1

*(iii)* 'भगवंताच्या मूर्ती' कोणास म्हटले आहे? 2

**26.** पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

(अ) कोणता 'वर' मिळाल्यामुळे ज्ञानदेव सुखी झाले? 2

(ब) 'श्री' गिरविताना लहानपणी लेखक का घाबरले? 2

**27.** (अ) लक्ष्मीबाई टिळक यांची व्यवहारात वागण्याची तत्त्वे कोणती? 2

(ब) 'खडे फोडणे' या वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. 2

**28.** (अ) 'कारण ते खऱ्या अर्थाने आमचे गुरु होते' हे वाक्य ससंदर्भ स्पष्ट करा. 3

(ब) 'ईश्वराची पाऊले कधी दिसली का?' या कवीच्या प्रश्नाला चांदण्या काय उत्तर देतात? 3

**29.** (अ) 'इथं मात्र एकलव्याची आराधना एकनिष्ठेने सुरु आहे', असे गिरीश प्रभुणे का म्हणतात? 3

(ब) समाजकंटकांनी महर्षी कर्वे यांचा छळ का व कसा केला? 3

**30.** (अ) खालील पद्यांशाचा ससंदर्भ अर्थ स्पष्ट करा. 3

तिजवीण नको राज्य, मज प्रिय साचा।
वनवास तिच्या जरि वनिंचा।

(ब) 'सोनं आणि माती दोन्ही पदरात घेते', असे घरधनीण का म्हणते? 3

**31.** (अ) आचार्य विनोबाजींच्या मते थोर व्यक्तींच्या जीवनात अपूर्व झळाळी कशामुळे दिसून येते? 3

(ब) प्राणीसृष्टीतील कोणकोणती विलोभनीय दृश्ये बालकवी टिपतात? 3

**32.** समाधानकारक पाऊस झाल्यानंतर दोन शेतकऱ्यांमध्ये झालेले संभाषण 8 ते 10 वाक्यात लिहा. 4

**33.** खालीलपैकी **एका** विषयावर सुमारे 200 शब्दांचा निबंध लिहा. 10

*(i)* डोंगरमाथ्यावरील एक गाव

*(ii)* आजच्या काळातील बदलते स्त्रीजीवन

*(i)* शौर्यपदक विजेत्या सैनिकाचे मनोगत

*(ii)* परीक्षा नसत्या तर...

**34.** या पाठ्यपुस्तकातील सर्वात अधिक कोणता पाठ तुम्हाला आवडतो? का? त्या पाठाचे नाव व लेखकाचे नाव लिहा. 4

**35.** आंतरशालेय चित्रकला स्पर्धेत तुमच्या मित्राला/मैत्रिणीला दुसरा क्रमांक प्राप्त झाला आहे. अभिनंदनपर पत्र लिहा. 8

**किंवा**

कचराकुंडीतील कचरा वेळेत उचलला जात नसल्याची तक्रार महापालिका अधिकाऱ्यांकडे नोंदवा.

**36.** पुढील उताऱ्याचा एक-तृतीयांश सारांश तुमच्या शब्दात लिहा व उताऱ्यास योग्य शीर्षक द्या : 4

वृंदावन बाग दोन्ही बाजूंनी मध्याकडे उतरत्या असलेल्या कावेरीच्या पात्रातच बनवलेली आहे. बागेत गेले म्हणजे मनुष्य पायऱ्यापायऱ्यांनी उतरत मध्याकडे जातो. मध्यभागी धरणातून सोडलेले कावेरीचे पाणी बाग दुभंगून पुढे वाहात जाते. बागेचे प्रतिबिंब आपल्या हृदयात साठवते आणि बागेच्या रोषणाईसाठी वीज निर्माण करण्याकरिता खाली शिवसमुद्राला जाते.

धरणाच्या कडेकडेने जाणाऱ्या रस्त्याने चालून ह्या प्रवाहापलीकडे जाता येते. हौशी माणसाला पलीकडे न्यायला संथपणे पुढे सरकणाऱ्या होड्या आहेत आणि फरफरत, फेसाळत घाईत जाणाऱ्या छोट्या मोटार बोटीदेखील आहेत. (69 words)

**37.** खालील माहितीच्या आधारे वृक्ष-आलेख तयार करा : 4

बाळाजी विश्वनाथ पेशवे यांना दोन मुले होती. चिमाजी व पहिला बाजीराव. चिमाजीचा मुलगा सदाशिव तर पहिल्या बाजीरावाची मुले बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब व रघुनाथराव. नानासाहेबांची मुले विश्वासराव, माधवराव व नारायणराव तर रघुनाथरावाचा मुलगा दुसरा बाजीराव.

★ ★ ★